महाराष्ट्र शासन,
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय
३ रा मजला (विस्तारीत), कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई – ४०० ६१४
संकेत स्थळ - https://mahaswayam.gov.in ईमेल– csdeeplacementact@gmail.com
दूरध्वनी क्र-.०२२-२७५७१९४२-४४ फॅक्स क्र.-०२२-२७५७३०१६

# लोकाभिप्राय मागविण्याबाबत सूचना

**“महाराष्ट्र खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था (नोंदणी व नियमन) विधेयक, २०२१” मसुदा**

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत **“महाराष्ट्र खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था ( नोंदणी व नियमन) विधेयक २०२१” चा मसुदा** तयार करण्यात आला आहे. सदरील मसुदा लोकभिप्राय मागविण्याकरिता या विभागाच्या https://mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर **“सूचना व परिपत्रक”** (“**NOTIFICATIONS / CIRCULAR**”) या शिर्षाखाली प्रसिध्द करण्यात आला आहे.

सदरील विधेयक अंतिम करण्यासाठी याबाबत राज्यातील लोक आणि यासंबंधीचे भागधारक यांना काही **हरकती, सुचना किंवा अभिप्राय** असल्यास त्या csdeeplacementact@gmail.com या ई-मेलद्वारे **दि. १४ सप्टेंबर, २०२१** रोजी रात्री १०.०० वा. पर्यंत सादर करण्याचे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे.

दिनांक - ३१.०८.२०२१
ठिकाण - नवी मुंबई

-स्वा-
**आयुक्त,**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
**महाराष्ट्र राज्य.**

Prakaran no.४२/२०

# “कायद्याचा मसुदा”

## महाराष्ट्र खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था ( नोंदणी व नियमन) विधेयक, २०२१

ज्या अर्थी, खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांच्या कार्यपद्धती कायदे आणि अंमलबजावणी यंत्रणा याबाबत सुस्पष्ट धोरण आवश्यक आहे जेणेकरून खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांना कामगार भरती प्रक्रिया पार पाडताना पारदर्शी आणि शोषण मुक्त होण्यास मदत होईल. यात पुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र राज्यात कामगार व कर्मचारी भरती प्रक्रिया, तत्संबंधित व तदानुषंगिक रोजगार सेवा देण्यासाठी कार्यरत आणि इच्छूक रोजगार सेवा प्रदाता संस्थांची नोंदणी व नियमन करणे इष्ट आहे;

त्या अर्थी, राज्यात खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था तसेच या क्षेत्रात नव्याने काम करण्यास इच्छूक संस्थांची नोंदणी व कार्यपद्धतीचे नियमन करणे गरजेचे आहे. यास्तव भारतीय गणराज्याच्या बहात्तराव्या वर्षी, महाराष्ट्र राज्य विधिमंडळाद्वारे, पुढील विधेयक करण्यात येत आहे.

### प्रकरण - १

## प्रारंभिक

### (१) संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ: -

१. या विधेयकास, **महाराष्ट्र खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था (नोंदणी व नियमन) विधेयक, २०२१** असे वाचण्यात यावे.

२. हे,संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

३. या विधेयकाच्या कार्यकक्षेत, महाराष्ट्र राज्यातील कार्यरत खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांद्वारे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचा समावेश असेल.

४. हे विधेयक, राज्य शासनाच्या राजपत्रात अधिसूचित दिनांकापासून अंमलात येईल.

### (२) व्याख्या: -

१) या विधेयकात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(i) “अपिलीय प्राधिकारी” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम- ६ अन्वये राज्य शासनाद्वारे नियुक्त कलम ८ अंतर्गत अपिलाची सुनावणी करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी अथवा प्राधिकरण, असा आहे;

(ii) “नियंत्रण प्राधिकारी”याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम- ६ मध्ये नमूद प्राधिकारी, असा आहे;

(iii) “नियोक्ता”याचा अर्थ, कोणतीही व्यक्ती किंवा आस्थापना, स्वत: किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत थेट किंवा इतरांकरिता कर्मचाऱ्यांस नियुक्त करतो, असा आहे;

(iv) “रोजगार” याचा अर्थ, शासनाने निर्धारित केलेल्या किमान वयाचे लोक, जे एका निर्धारित कालावधी करिता, पगारासाठी किंवा नफा कमविणेसाठी सेवा पुरविणे किंवा व्यवसाय करणे या कोणत्याही क्रियेत समावेश केलेले आहेत, असा आहे;

(v) “आस्थापना” याचा अर्थ, अस्तित्वातील कोणत्याही कायद्यांतर्गत नोंदणीकृत किंवा नोंदणीकृत नसलेली रोजगार उपलब्ध करुन देणारी कोणतीही व्यक्ती, कोणतीही संस्था, भागीदारी संस्था, कंपनी किंवा कारखाना किंवा धर्मादाय किंवा सहकारी संस्था, असा आहे;

(vi) “शासन” याचा अर्थ, जेथे संदर्भित असेल तेथे महाराष्ट्र शासन, असा आहे;

(vii) “नोकरी साधक” याचा अर्थ, नोकरी, काम अथवा रोजगार शोधणारी व्यक्ती, असा आहे;

(viii) -स्थानिक कार्यालय◦ याचा अर्थ राज्य शासनाद्वारे निर्मित आणि व्यवस्थापन करण्यात येत असलेले कार्यालय, ठिकाण अथवा संकेतस्थळ ज्याचे अधिकार क्षेत्रात संबंधित खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था कार्यरत आहेत.

(ix) “विदेशात प्लेसमेंट” याचा अर्थ, विदेशामधील असणा-या आस्थापनांसाठी राबविण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेद्वारे योग्य उमेदवाराची प्रत्यक्ष नियुक्ती, असा आहे;

(x)“प्लेसमेंट” याचा अर्थ, संबंधित आस्थापनेमध्ये योग्य उमेदवाराची प्रत्यक्षात नियुक्ती, असा आहे;

(xi) “खाजगी रोजगारसेवा प्रदाता संस्था” याचा अर्थ, सार्वजनिक प्राधिकरणापासून स्वतंत्र, कोणतीही नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्तीअथवा व्यक्तींची संस्था, महाराष्ट्र राज्य किंवा भारतातील कोणत्याही राज्यात किंवा भारताबाहेरील देशात खाजगी क्षेत्रात अत्युत्तम कुशल, कुशल, अर्धकुशल किंवा अकुशल व्यक्तींच्या रोजगार भरती प्रक्रिया करतात, जो की,

(xii) “विहित” म्हणजे, या विधेयकान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे.

(xiii) “नोंदणी प्रमाणपत्र” याचा अर्थ, या विधेयकाद्वारे प्रदान करण्यात आलेले लिखित साधन, प्राधिकार, परवानगी किंवा संमतीपत्र, असा आहे;

(xiv) “भरती प्रक्रिया” याचा अर्थ, कोणत्याही पध्दतीने किंवा इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन पद्धतीने, रोजगार मेळावे, परिसर भरती, प्रशिक्षण देऊन नोकरी देणे किंवा देशातील अथवा परदेशातील खाजगी नियोक्त्यांसाठी प्रशिक्षण व स्पर्धा परीक्षा यासाठी अर्ज संकलन, अर्जांची छाननी, परीक्षा आयोजित करणे, योग्य उमेदवार किंवा नोकरी शोधणा-यांचीनांवे प्रायोजित करणे किंवा शिफारस करणे यासारख्या प्रक्रिया करणे आणि त्यानंतर रोजगार परिणाम संप्रेषण स्थानिक रोजगार विनिमय केंद्राकडे देणे, असा आहे.

(xv) “सेवा शुल्क किंवा फी” म्हणजे रोजगार सेवा प्रदान करण्यासाठी नियोक्ता आस्थापना किंवा उमेदवार यांना आकारलेली रक्कम, असा आहे.

२) या विधेयकात वापरलेले शब्द आणि अभिव्यक्ती परिभाषित केलेले नसल्यास, त्याचा अर्थ, सध्या लागू असणाऱ्या,शासनाने अधिसूचित केलेल्या कोणत्याही संबंधितसंहिता (Code) /विधेयक )Act)/नियम (Rules) यामध्ये परिभाषित केल्याप्रमाणे असेल.

## प्रकरण – २

## अनधिकृत भरती प्रक्रियेस प्रतिबंध

### ३. नोंदणीकृत नसलेल्या खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थाना भरती प्रक्रिया राबवण्यास प्रतिबंध करणे.

१) या विधेयकाद्वारे नोंदणी प्रमाणपत्र धारक खाजगी रोजगार प्रदाता संस्था वगळता इतर कोणत्याही व्यक्तीला, खाजगी रोजगार प्रदाता संस्थेला किंवा आस्थापनेला महाराष्ट्र राज्यात ऑनलाईन पद्धतीने अथवा प्रत्यक्ष मुलाखतीने जिल्ह्यात, राज्यात, देशात अथवा विदेशा करिता पदभरती प्रक्रिया राबवण्यास, उमेदवारांची जुळवाजुळव करण्यास, पदभरती बाबत जाहिरात प्रकाशित करून नियोक्त्यांसाठी पदभरती करण्यास तसेच नियोक्त्यांच्या वतीने पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

तथापि, हा अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी कार्यरत असलेल्या खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांना हा अधिनियम अमंलात आल्यापासून १८० दिवसांच्या आत नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य असेल.

## प्रकरण – ३

## रोजगार सेवा प्रदाता संस्थेची नोंदणी

### ४. रोजगार सेवा प्रदाता संस्थेची नोंदणी व नूतनीकरण

१) रोजगार सेवा प्रदाता नोंदणीसाठी कलम ३ मध्ये नमूद केल्यानुसार विहित नमुन्यात अर्ज व योग्य पद्धतीने सादर करावा. अर्जा सोबत विहित शुल्क (ना परतावा), निर्धारित केल्याप्रमाणे सुरक्षा ठेव आणि आवश्यक ते कागदपत्रे संलग्नित केलेले असावेत.

२) रोजगार सेवा प्रदाता संस्थेचे वर्गिकरण कार्यक्षेत्रानुसार जिल्हा, राज्य, देश आणि विदेश स्तरावरील असे वर्गीकृत केलेले असेल.

३) नियंत्रण प्राधिकारी यांचे मार्फत कलम ३ मध्ये नमूद पद्धतीनुसार अर्जाची छाननी आणि इतर आवश्यक तपासणीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

४) या विधेयकाखाली विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पात्र अर्जदारांना नोंदणी प्रमाणपत्र जारी केले जाईल. एकदा केलेली नोंदणी प्रमाणपत्र जारी केल्यापासून तीन वर्षांसाठी वैध असेल.

५) या विधेयकाखाली विहित केल्याप्रमाणे वेळोवेळी अर्ज आणि नूतनीकरण शुल्क (ना परतावा) सादर केल्यास नोंदणीचे नूतनीकरण केले जाऊ शकेल.

६) या कायद्यांतर्गत जारी केलेले नोंदणी प्रमाणपत्र अहस्तांतरणीय असेल. कोणत्याही परिस्थितीत या कराराअंतर्गत प्राप्त होणारे लाभ विकणे, हस्तांतरित करणे, तारण ठेवणे, संलग्न करणे ह्या बाबी करता येणार नाहीत.

## ५) निलंबन, निरस्तीकरण आणि नोंदणी रद्द करणे

१) जर नियंत्रण प्राधिकारी खालील नमूद संदर्भात समाधानी असल्यास किंवा अन्यथा,

अ) कलम ४ अन्वये जारी करण्यात आलेली नोंदणी प्रमाणपत्र चुकीची माहिती, फसवणूक किंवा कोणत्याही भौतिक वस्तुस्थितीचे दडवून प्राप्त करून प्राप्त करून घेतले असल्यास,

ब) नियोक्त्याकडे रोजगारासाठी पाठवणी केलेल्या उमेदवाराने,अत्यधिक फी आकारणे, फसवणूक करणे, आश्वासन व्यतिरिक्त नोकरी पुरविणे, इत्यादी, कोणत्याही विशिष्ट घटनेचा आरोप करून लेखी तक्रार सादर केल्यास किंवा,

क) नोंदणी प्रमाणपत्रधारक रोजगार सेवा प्रदात्याने सक्षम कारणाशिवाय अटी व नियमांचे पालन करण्यात अपयशी ठरल्यास, निश्चित करण्यात आलेली दंडाची रक्कम नियंत्रण प्राधिकारी कोणताही पूर्वग्रह न ठेवता, अश्या संस्थेला आपली बाजू मांडण्याची पुरेसी संधी देऊन लेखी आदेशाद्वारे नोंदणी रद्द करू शकतात तसेच सुरक्षा ठेव जप्त करू शकतात आणि कलम (३) अंतर्गत उप-कलम (१) नुसार त्याला किंवा त्याचा कोणताही भाग आणि नोंदणी धारकास आदेश देऊन कळवू शकतात.

परंतु नियंत्रण प्राधिकाऱ्याला विशिष्ट कारणास्तव असे करणे आवश्यक वाटल्यास, अशी नोंदणी रद्द करणे किंवा जप्त करण्याचे आदेश, आदेशानुसार निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी नोंदणी स्थगित करणे, सेवा निलंबित करणे, असे आदेश देता येतील.

२) या विधेयकाच्या अनुषंगाने बनविल्या जाणा-या नियमांच्या अधिन राहून, नियंत्रण प्राधिकारी या विधेयकानुसार जारी केल्या जाणा-या नोंदणी प्रमाणपत्रात बदल किंवा सुधारणा करू शकतील.

# प्रकरण - ४

# प्राधिकारी

## ६) राज्य सरकार अधिकृत राजपत्रात अधिसूचनेद्वारे -

१) या विधेयकाच्या व त्यातील नियमांच्या प्रयोजनासाठी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता या दर्जाच्या अधिकाऱ्यास राज्य नियंत्रण प्राधिकारी म्हणून नियुक्त करील.

२) सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता या पदापेक्षा कनिष्ठ नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्यास या विधेयकाच्या व त्यातील नियमांच्या प्रयोजनासाठी नियंत्रण प्राधिकारी म्हणून नियुक्ती करील आणि नियंत्रण प्राधिकारी कोणत्या मर्यादेअंतर्गत अधिकाराचा वापर करेल याची मर्यादा निश्चित करील.

३) या विधेयकाच्या व त्यातील नियमांच्या प्रयोजनासाठी प्रथम अपीलीय प्राधिकारी म्हणून उपायुक्त , कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता या पदापेक्षा कनिष्ठ नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्यास नियुक्त करील.

४) या विधेयकाच्या व त्यातील नियमांच्या प्रयोजनासाठी द्वितीय अपीलीय प्राधिकारी म्हणून सचिव / प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव , कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता या पदापेक्षा कनिष्ठ नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्यास नियुक्त करील.

## ७) अधिकार आणि कर्तव्ये (नियंत्रण अधिकारी)

१) नियंत्रण प्राधिकाऱ्याची,दाखल तक्रारीच्या आधारावर किंवा अन्यथा, अशी खात्री झाली असेल की संबंधित रोजगार सेवा प्रदाता संस्था कलम ३ मधील तरतुदीचे व नियमांचे उल्लंघन करून भरती प्रक्रिया राबवत असेल तर त्वरित प्रभावाने स्वयंस्पष्ट आदेशाद्वारे अशा रोजगार सेवा प्रदाता संस्था बंद करणे अथवा भरती प्रक्रिया रद्द करण्याची कार्यवाही करू शकतील.

परंतु अशी कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी नियंत्रण अधिकारी संबंधित रोजगार सेवा प्रदात्याला आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी देईल.

२) नियंत्रण प्राधिकाऱ्याची एखाद्या खाजगी रोजगार प्रदाता संस्थेबाबत अशी खात्री झाली असेल की, त्या संस्थेला अपवादात्मक परिस्थितीत एका वर्षाच्या मर्यादेत भरती प्रक्रिया राबवून पात्र उमेदवारांना नियुक्ती देणे आवश्यक आहे, तर अशा संस्थेला साध्या कागदावर अर्ज करून कोणत्याही नोंदणी प्रमाणपत्राशिवाय भरती आणि नियुक्ती प्रक्रिया पार पडता येईल.

३) नियंत्रण प्राधिकारी, या अधिनियमान्वये विहीत केल्याप्रमाणे त्याच्या शक्ती आणि कार्ये यांचा वापर करील.

४) नियंत्रण प्राधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराचा आणि कार्याचा वापर करण्याची पद्धती या अधिनियमान्वये विहित करण्यात येईल.

## प्रकरण- ५
## अपील

## ८) अपील

१) या विधेयकातील कलम (४) किंवा (५) अन्वये नियंत्रण प्राधिकारी यांनीदिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली व्यक्ती / संस्था अशा पारित केलेल्या आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाद मागता येईल.

परंतु, जर अपीलकर्त्याला त्या मुदतीत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी खात्री पटली तर, त्यास,अपवादात्मक प्रकरणी, ३० दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही जास्तीत जास्त ६० दिवसांच्या कालवधीपर्यंतदाखल अपीलावर सुनावणी करता येईल.

२) प्रथम अपिलीय प्राधिकारी,पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अपील झाल्यानंतर, अपीलकर्त्यास आपली बाजू मांडण्यासाठी पुरेसी संधी देऊन सुनावणी करतील आणि ४५ दिवसांच्या आत अपील निकाली काढतील.

३) अपीलकर्ता प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशाबाबत जर व्यथित झाला असेल, तर,ज्या दिनांकास प्रथम अपिलीय प्रधिका-याचा आदेश मिळाला असेल त्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत किंवा प्रथम अपिलीय प्राधिका-याचा आदेश मिळाला नसेल त्याबाबतीत, पहिले अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून४५ दिवसानंतर द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्याकडे,प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरूध्द दुसरेअपील दाखल करता येईल:

परंतु, जर अपीलकर्त्याला विहीत मुदतीत दुसरे अपील दाखल करण्यासाठी पर्याप्त कारणास्तव प्रतिबंधित केल्याचे निदर्शनास आले असेल, याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी खात्री पटली तर, त्यास, अपवादात्मक प्रकरणी, जास्तीत जास्त ६० दिवसांच्या कालावधीस अधिन राहून, ३० दिवसांचा किंवा, यथास्थिती ४५ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरदेखील, अपील दाखल करून घेता येईल.

४) द्वितीय अपिलीय प्राधिका-यास, तो आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत अपीलकर्त्याला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिका-याला निदेश देता येईल किंवा त्यास ते अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या कालावधीच्या आत अपील फेटाळण्याची कारणेलिखीतनमूद करून अपील फेटाळता येईल:

परंतु, कोणताही आदेश काढण्यापूर्वी, द्वितीय अपिलीय प्राधिकारी, अपीलकर्त्यास तसेच पदनिर्देशित अधिका-याला किंवा नियंत्रण प्राधिका-यास किंवा या प्रयोजनासाठी यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही दुय्यम अधिका-याला, आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

## प्रकरण - ६

## रोजगार सेवा प्रदात्याचे कर्तव्ये व जबाबदा-या

### ९) खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थेची कर्तव्ये आणि जबाबदा-या

१) खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थाद्वारे महाराष्ट्र राज्यात अथवा राज्याबाहेर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती नियंत्रण प्राधिकारी यांना ६० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

२) कोणतीही खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्था कायद्याद्वारे विहित केलेल्या वयोमर्यादेपेक्षा कमी वयाच्या व्यक्तीला नियोक्त्याची मागणी असली तरीही रोजगार उपलब्ध करुन देणार नाही.

३) प्रत्येक रोजगार सेवा प्रदाता संस्था त्यांच्या कार्यालयाबाहेर दर्शनी भागात, विहीत करण्यात येईल अशी यथोचित कार्यपध्दती अनुसरून, विहित नमुन्यात, आकारात आणि रंगसंगती असलेला फलक प्रदर्शित करेल. ज्यामध्ये रोजगार सेवा प्रदाता संस्थेचे नांव, पत्ता, संपर्क तपशील, नोंदणी क्रमांक, वैधता दिनांक इ. बाबी नमूद असतील.

४) प्रत्येक रोजगार सेवा प्रदाता संस्थेला नियंत्रण प्राधिकरणाद्वारे जारी केलेले नोंदणी प्रमाणपत्र स्वागत कक्षात प्रदर्शित करणे आवश्यक असेल.

५) प्रत्येक रोजगार सेवा प्रदाता संस्थेने शासनाच्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निर्दिष्ट केल्याप्रमाणे,रोजगार उपलब्ध करून दिलेल्या व्यक्तीचे नाव, पत्ता, व संपर्क, आस्थापनांची नावे, पत्ते व संपर्क, इतर तपशीलांमध्ये लिंग, कायमस्वरूपी आणि संबंधिताचा पत्ता, फोटो, कामाचे स्वरूप आणि त्याद्वारे रोजगार उपलब्ध केलेल्या व्यक्तींचे इतर तपशील, विहीत करण्यात येईल अशी यथोचित कार्यपध्दती अनुसरून, रजिस्टरमध्ये नोंदवून ठेवणे आवश्यक राहील.

६) नियंत्रण प्राधिकारी यांनी या विधेयकाचे तंतोतंत पालन आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी, विहीत करण्यात येईल अशी यथोचित कार्यपध्दती अनुसरून, रोजगार सेवा प्रदाता संस्थेला नियंत्रण अधिकाऱ्याकडून वेळोवेळी मागणी करण्यात आलेले अभिलेख सादर करणे आवश्यक राहील.

७) रोजगार सेवा प्रदाता संस्थेला रोजगार उपलब्ध करून देण्याच्या व्यतिरिक्त नोकरी साधक, नियोक्ता यांची तसेच इतर आवश्यक माहिती, डेटा या संदर्भात अत्यंत गोपनियता व सचोटी राखणे बंधनकारक असेल.

८) रोजगार सेवा प्रदाता संस्थेला इतर कोणत्याही अनधिकृत हेतूसाठी माहिती, डेटा इत्यादींचे प्रसारण न करणे बंधनकारकअसेल.

९) रोजगार सेवा प्रदाता संस्थेला नोकरी शोधकाच्या पात्रता आणि मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक राहील, तथापी, नोकरी शोधकाने लिखित अर्जाद्वारे इतर कोणताही रोजगाराचा स्वीकार करण्याची तयारी दर्शवल्यास तसा रोजगार उपलब्ध करून देता येईल.

१०) रोजगार सेवा प्रदाता संस्थेला आर्थिक व इतर बाबतीत कार्यालयीन पत्रव्यवहार करतांना जारी केलेल्या नोंदणी क्रमांक नमूद करणे बंधनकारक राहील.

११) इतर कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि कार्यपद्धती बाबत सूचना शासनातर्फे वेळोवेळी निर्गमित केल्या जातील.

## प्रकरण - ७

## खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांना उपलब्ध सुविधा

### १०.खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांना खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध असतील

१) स्थानिक कार्यालय नोंदणीकृत खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांना विहित पद्धतीने पात्र उमेदवारांची ओळख, जुळवाजुळव करण्याची सुविधा उपलब्ध करून देईल.

२) स्थानिक कार्यालय नोंदणीकृत खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांच्या सहकार्याने रोजगार मेळावे, व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन शिबिरे आणि सेमिनार यांचे आयोजन करेल.

३) स्थानिक कार्यालय नोंदणीकृत खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांकडून प्राप्त यादीतील उमेदवारांना संकेतस्थळावर नोंदणी सुविधा उपलब्ध करून देईल.

## प्रकरण – ८
## अपराध व शास्ती

### ११) अपराध व शिक्षा

१) या विधेयकाच्या कलम ३ च्या तरतुदींचे पूर्णतः अथवा अंशतः उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती किंवा रोजगार सेवा प्रदाता संस्था ७ वर्षा इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा किंवा रुपये एक लाखापेक्षा कमी नसेल इतका दंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

२) कोणतीही व्यक्ती किंवा रोजगार सेवा प्रदाता संस्था जो कलम ९च्या तरतुदींचा किंवा या कायद्यान्वये तयार केलेल्या कोणत्याही नोंदणी प्रमाणपत्र अथवा या अटींमधील कोणत्याही नियमांचे पूर्णतः अथवा अंशतः उल्लंघन करीत असेल तर त्याला १ (एक) वर्षे पर्यंतची कारावासाची शिक्षा किंवा रुपये पन्नास हजारपेक्षा कमी नसेल इतका दंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

### १२) कंपन्यांकडून अपराध:

१) या विधेयकांतर्गत गुन्हा एखाद्या कंपनीने केला असेल तर प्रत्येक व्यक्ती, जेव्हा हा गुन्हा घडला होता तेव्हा तो प्रभारी होता आणि कंपनीच्या व्यवसायासाठी कंपनीला जबाबदार होता, तसेच कंपनीया गुन्ह्यासाठी दोषी मानली जाईल आणि त्याविरूद्ध कारवाही केली जाईल आणि त्यानुसार शिक्षा दिली जाईल.

परंतु या उप-कलमात समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीस अशा कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही शिक्षेस पात्र केले जाऊ शकत नाही, जर त्याने हे सिद्ध केले की जर गुन्हा त्याच्या माहितीशिवाय केला गेला असेल किंवा त्याने अशा गुन्ह्यापासून बचाव करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला असेल.

२) तथापी या विधेयकान्वये जेथे उप-कलम (१), मध्ये नमूद गैरप्रकार कंपनीने संमती किंवा संगनमत करून केला आहे असे सिद्ध झाले तर, कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी, असे संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील या गुन्ह्यामध्ये दोषी असल्याचे मानले जातील आणि त्यानुसार कारवाई केली जाईल आणि त्यानुसार शिक्षा होईल.

स्पष्टीकरण - या भागाच्या अनुषंगाने, -

(१) " कंपनी " म्हणजे कॉर्पोरेट बॉडी आणि त्यात एखादी फर्म किंवा व्यक्ती किंवा इतर व्यक्तींची संस्था किंवा इतर संघटना समाविष्ट असते, त्यामध्ये समाविष्ट असो वा नसो; आणि

(२) फर्मच्या संदर्भात "संचालक" याचा अर्थ फर्ममधील भागीदार आणि व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह किंवा मंडळ संबद्धतेच्या संबंधात म्हणजे त्याचा कार्यभार नियंत्रित करणारा एखादा सदस्य.

## प्रकरण – ९
## संकीर्ण

### १३) प्रदान केलेल्या सेवांसाठी शुल्क : -

१) या विधेयकान्वये वैध नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या रोजगार सेवा प्रदाता संस्थेला रोजगार सेवा पुरवलेल्या नियोक्त्याकडून परस्पर समतीने निश्चित केलेले सेवा शुल्क आकारणे विधिसंमत असेल.

२) रोजगार सेवा प्रदाता संस्थेला नोकरी साधकाकडून या विधेयकाच्या नियमावलीत नमूद केल्या व्यतिरिक्त कोणतेही शुल्क, मानधन, नफा, नुकसानभरपाई मागता येणार नाही.

### १४) स्वतंत्र नियमांद्वारे किंवा कार्यकारी आदेशाद्वारे तयार केलेल्या आस्थापनांना कलम ९ (१) लागू करणे : -

स्वतंत्र नियमांद्वारे किंवा कार्यकारी आदेशाद्वारे तयार केलेल्या आस्थापनांना कलम ९ (१) नुसार उत्परिवर्तन लागू होईल .

परंतु प्रदान केलेले राज्य सरकार किंवा महाराष्ट्र राज्यातील शासकीय विभाग ज्याला वरील संस्थांद्वारे रोजगार सेवा प्रदान केल्या आहेत त्यांनादेखील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय विहित नमुन्यात आकडेवारीची माहिती देणे आवश्यक असेल.

स्पष्टीकरणः - *स्वतंत्र नियम / कार्यकारी आदेशाद्वारे तयार केलेल्या निकाय म्हणजे राज्य निवड मंडळ, जिल्हा निवड समिती आणि यासारखे इ.*

**१५) अपराधाची दखल : -**

१) महानगर दंडाधिकारी किंवा न्यायदंडाधिकारी प्रथम (वर्ग) दर्जा पेक्षा कमी पदावरील कोणतेही न्यायालय या विधेयकान्वये दंडनीय असा कोणताही गुन्हा दाखल करू शकत नाही.

२) या विधेयकान्वये दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असतील

## १६) शोध किंवा जप्तीसंबंधी तरतूदी लागू करणे :-

शोध किंवा जप्तीसंबंधी कोणत्याही शोध किंवा जप्तीसंबंधी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (क्रमांक २, १९७४)च्या तरतुदी या विधेयकान्वये केलेल्या कोणत्याही शोध किंवा जप्तीस लागू असतील.

**१७) लोकसेवक:-**

या विधेयकांतर्गत नियुक्त केलेला नियंत्रण प्राधिकारी, अपीलीय अधिकारी यांना भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक मानले जाईल.

**१८) या कायद्याचे इतरांसमवेत आस्तित्व:-**

हे विधेयक अस्तित्त्वात असलेल्या इतर कायद्यांना अधिक्रमित करणार नाही.

**१९) नियम बनविण्याची शक्ती -**

(१) राज्य सरकार अधिसूचनेद्वारे, विधेयकातील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र नियम तयार करेल.

(२) विशेषत: आणि आधीच्या सामान्यतेबद्दल पूर्वग्रह न ठेवता या कायद्याशी संबंधित सर्व किंवा खालील नियम बनवता येतील.

(क) रोजगार सेवा प्रदाता संस्थेला नोंदणी करावयाच्या अर्जाचा नमुना व पद्धती

(ख) अर्जासोबत जमा करावयाचे ना परतावा शुल्क सुरक्षा ठेव रक्कम.

(ग) पडताळणी आणि चौकशी करण्याबाबत.

(घ) नोंदणी करणेबाबत अटी व शर्ती

(च) ना परतावा शुल्क आणि नुतनीकरण पद्धती.

(छ) नोंदणी न करता अपवादात्मक परिस्थितीत भरती प्रक्रिया राबवण्यास आणि नियुक्तीस परवानगी देणे.

(ज)नियंत्रण प्राधिका-याचे अधिकार व कर्तव्ये.

(ण) नियंत्रण प्राधिका-याने आपले अधिकार आणि कर्तव्ये पार पडण्यासाठी अवलंबायची कार्यपद्धती

(त) अपील अर्ज आणि अपील करण्याची पद्धत

(थ) खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थेची अधिकार आणि कर्तव्ये

(द) खाजगी रोजगार सेवा प्रदाता संस्थांना उपलब्ध सुविधा

(ध) प्रदान करण्यात आलेल्या सेवांचे शुल्क आकारण्याची पद्धती

(न) इतर कोणतीही बाब ,जी या विधेयकासाठी आवश्यक आहे

३) या विधेयकांतर्गत तयार केलेला प्रत्येक नियम राज्य विधिमंडळासमोर सादर केला जाईल.

२०) सदभावनेने केलेल्या कृतीस संरक्षण:-

या विधेयकाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमानुसार सदभावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसाठी, कोणत्याही व्यक्ती, राज्य शासन, कोणत्याही अधिकारी विरुध्द कोणताही दावा, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

२१) अडचणी दूर करण्याचा अधिकार :-

या विधेयकाच्या तरतुदींची अंमलबजावणी करतांना कोणतीही अडचण उद्भवल्यास राज्य शासन प्रसंगानुरुप ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा ईष्ट वाटेल अशी कायद्याच्या तरतुदींची विसंगत नसेलेली कोणतेही गोष्ट राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे करता येईल.

परंतु, या कायद्याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ३ (तीन) वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

---